ePaper

**काँग्रेसची 'न्याय यात्रा ; 67 दिवसांत 15 राज्यांमधील 100 लोकसभा मतदारसंघांतून प्रवास**




| वर्ष - 7 | अंक - 245 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 14 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- सिद्धूने पटकावले रौप्य पदक!
- तमन्ना महेश बाबू एकत्र
- निर्यातीवरील बंदी कायम राहणार
- माझ्या दाढीत अनेकांच्या नाड्या!





### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हवा यंत्रणेवर वचक

# प्रशासकीय दादागिरी!

### » शिवसेना, भाजपाच्या स्थानिक नेत्यांमध्ये कमालीची अस्वस्थता

।पुणे। महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पीएमआरडी आयुक्त आणि पोलीस दलातील प्रमुख ५ ते ६ बड्या सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीच्या हालचालींना वेग आला असून, यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या मर्जीतील अधिकारी नियुक्त केले जाणार आहेत. त्यामुळे शिवसेना आणि भाजपाच्या स्थानिक पदाधिकारी आणि नेत्यांची अस्वस्थता वाढली असून, आगामी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याचा फटका भाजपा-सेनेला होणार, असा दावा केला जात आहे. मात्र, राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या स्थानिक नेत्यांचा 'कॉन्फिडन्स' वाढला असून, नव्या प्रशासकीय बदलांमुळे पुणे जिल्हा नियोजन समिती (DPDC) मधील वादाची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता आहे.**

विभागीय आयुक्त, पीएमआरडीए आयुक्त, पुणे आयुक्त आणि पिंपरी-चिंचवड आयुक्त यांच्यासह पुणे जिल्हाधिकारी अशा प्रमुख ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदली उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या मर्जीनुसार होत आहेत. मात्र, यामुळे भाजपा- शिवसेना स्थानिक पदाधिकाऱ्यांचा 'करेक्ट कार्यक्रम' होणार आहे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात ज्याप्रमाणे अजित पवार यांनी जिल्ह्याची सूत्रे हाती घेतली. त्याप्रमाणे आता महायुतीमध्ये सहभागी झाल्यानंतर अधिकारांचे एकत्रिकरण झाले आहे. परिणामी, शिवसेना आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांच्या निर्णय स्वातंत्र्यावर एकप्रकारे गदा आली आहे.

आघाडी सरकारच्या काळात आणि त्यानंतर महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात पुणे जिल्ह्यातील पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका यासह ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी आणि अजित पवार यांच्याशी दोनहात करणाऱ्या आणि संघर्ष करणाऱ्या स्थानिक नेत्यांची आता कोंडी झाली आहे. अजित पवार यांच्या सत्तेत सहभाग झाला. त्यानंतर पालकमंत्रीपदाची धुरा हाती आल्यानंतर राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांचे मनोबल वाढले.

विकासकामे आणि प्रलंबित प्रकल्पांबाबत अजित पवार निर्णय घेत आहेत. त्यामुळे राजकीय दृष्ट्या श्रेय मिळत नाही, अशी अवस्था आहे.

आता अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत हालचाली सुरू आहेत. महायुतीच्या सत्ताकाळात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच उचलबांगडी करण्यात येणार आहे. तसेच, आगामी नियुक्त्यांमध्ये अजित पवार यांचा रोल महत्त्वपूर्ण राहणार आहे. किंबहुना, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए आणि जिल्हाधिकारी पदाच्या नियुक्त्या निश्चित झाल्या असून, यामध्ये अजित पवार यांची भूमिका निर्णायक राहणार आहे. दुसरीकडे, अजितदादा पवार यांच्या मर्जीतील अधिकारी प्रमुखपदी नियुक्ती केल्यास जिल्ह्यातील भाजपा आमदार, खासदार आणि माजी नगरसेवक यांची कामे होत नाही किंवा न्यायही मिळत नाही. किंबहुना, जी अवस्था एकनाथ शिंदे आणि गटाची 'मविआ' मध्ये असताना झाली. तशीच अवस्था भाजपाची पुणे जिल्ह्यात होणार आहे. जिल्ह्यातील २१ विधानसभा आणि ४ लोकसभा मतदार संघावर सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा थेट परिणाम होणार आहे. पुणे जिल्हा नियोजन समितीमध्ये भाजपा, शिवसेना समर्थक सदस्यांनी केलेली तक्रार आणि झालेला वाद हा त्याची पुष्टी करण्यासाठी पुरेसा आहे. सध्यस्थितीला पुणे जिल्ह्यात अजित पवार यांच्या तोडीचा किंवा राष्ट्रवादीच्या राजकीय डावपेचांना ओळखून रणनिती करेल आणि भाजपा कार्यकर्त्यांना न्याय देईल, असा एकही नेता किंवा मंत्री नाही. त्यात अधिकारीही त्यांच्याच मर्जीतील असल्यास भाजपा- शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांना ताकद मिळणार नाही, अशी खंत व्यक्त केली जात आहे.आता राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची ताकद वाढली असून, त्यांना पालकमंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून सर्वोतोपरी ताकद दिली जाते. त्याला प्रशासकीय साथ मिळाली की, हेच पदाधिकारी स्थानिक पातळीवर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, सत्तेत सहभागी असल्यामुळे कुणालाही उघडपणे बोलता येत नाही, ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. पुणे जिल्ह्यात भाजपाची ताकद कायम ठेवायची असेल, तर वरिष्ठ ५ सनदी अधिकारी नियुक्ती करताना भाजपा आणि शिवसेनच्या स्थानिक नेत्यांनाही विश्वासात घेतले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




## ... अशी आहे सोसायटी फेडरेशनची भूमिका

"गेल्या पाच वर्षांमध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेत चार आयुक्तांनी कामकाज पाहिजे. ३ वर्षांच्या कार्यकाळ एकाही आयुक्तांना पूर्ण करता आला नाही. एखादा सनदी अधिकारी नव्याने रुजू झाल्यानंतर त्याला शहरातील विकासकामे, प्रलंबित प्रकल्प आणि नागरिकांच्या अपेक्षा समजून घेण्यासाठी किमान सात ते आठ महिन्यांचा कालावधी लागतो. आता विद्यमान आयुक्त शेखर सिंह यांच्या बदलीबाबत चर्चा सुरू आहे. मात्र, सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमध्ये राजकीय हस्तक्षेप होवू नये. कारण, त्याचा परिणाम विकासकामांवर होतो, अशी आमची भावना आहे. सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर आम्हाला वेळोवेळी पाठपुरावा करावा लागतो. प्रमुख अधिकारी वारंवार बदलल्यामुळे आम्हाला पुन्हा आमच्या समस्या संबंधित अधिकाऱ्यांना समजून सांगाव्या लागतात. त्यामुळे वेळ व प्रशासकीय दिरंगाई होते. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागतो.

- सचिन लोंढे, उपाध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.

# मेट्रो स्थानकांत स्वतंत्र वाहनतळ

## पालिकेची 400 मीटर अंतरातील भूखंड देण्याची तयारी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणेरी मेट्रोचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सुरू आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील या मेट्रोच्या स्थानकांना काही ठिकाणी वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने कोंडी झाली होती. यावर पीएमआरडीएने महापालिकेकडे आरक्षित भूखंडांची मागणी केली होती. महापालिकेने मेट्रो स्थानकांच्या १०० ते ४०० मीटर अंतरातील आठ भूखंड देण्याची तयारी दर्शविली असून, त्यावर लवकरच अंतिम निर्णय होणार आहे.**





पुणेरी मेट्रोची एकूण २३ स्थानके आहेत. त्यांपैकी केवळ माण, बालेवाडी आणि शिवाजीनगर या तीनच स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळाली आहे. इतर स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने पीएमआरडीएने अखेर महापालिकेकडे धाव घेतली. याबाबत पीएमआरडीएने मागील महिन्यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना पत्र पाठविले. त्यात बाणेर आणि बालेवाडी परिसरातील आठ आरक्षित भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. पीएमआरडीएला हे भूखंड मिळाल्यास बालेवाडी क्रीडा संकुल, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेरगाव आणि बाणेर या सात मेट्रो स्थानकांना वाहनतळासाठी स्वतंत्र जागा मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याआधी पीएमआरडीएने मेट्रो स्थानकांच्या वाहनतळासाठी महापालिकेकडे जागा मागितली होती. परंतु, या जागा वेगवेगळ्या ठिकाणी आणि खासगी मालकीच्या होत्या. त्यामुळे महापालिकेने याला नकार दिला होता. त्याऐवजी आरक्षित भूखंड देण्याची तयारी महापालिकेने दर्शवली होती. त्यानंतर पीएमआरडीएने आरक्षित भूखंड शोधून सोईच्या भूखंडांची यादी महापालिकेला दिली आहे. हे सर्व भूखंड सात मेट्रो स्थानकांच्या सुमारे १०० ते ४०० मीटर अंतरावर आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी स्वतंत्र वाहनतळ उभारणे सोईचे ठरणार आहे. यावर महापालिकेकडून लवकरच निर्णय अपेक्षित आहे. पीएमआरडीएने मागितलेले भूखंड हे वेगवेगळ्या कारणांसाठी आरक्षित आहेत. त्यांचा वाहनतळासाठी वापर करावयाचा झाल्यास ते आरक्षण बदलावे लागणार आहे. याबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने आरक्षित भूखंड समितीकडे पाठविला आहे. समितीकडून शिक्कामोर्तब झाल्यानंतर हा प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडे पाठवला जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. इतर स्थानकांना वाहनतळासाठी जागा मिळत नसल्याने पीएमआरडीएने अखेर महापालिकेकडे धाव घेतली. याबाबत पीएमआरडीएने मागील महिन्यात महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना पत्र पाठविले. त्यात बाणेर आणि बालेवाडी परिसरातील आठ आरक्षित भूखंडांची मागणी करण्यात आली आहे. पीएमआरडीएला हे भूखंड मिळाल्यास बालेवाडी क्रीडा संकुल, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेरगाव आणि बाणेर या सात मेट्रो स्थानकांना वाहनतळासाठी स्वतंत्र जागा मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, याआधी पीएमआरडीएने महापालिकेने याला नकार दिला होता. त्याऐवजी आरक्षित भूखंड देण्याची तयारी महापालिकेने दर्शवली.

> पीएमआरडीएला आठ भूखंड देण्याचा प्रस्ताव आहे. हे भूखंड ३० वर्षांच्या भाडेकराराने दिले जातील. त्यासाठी वर्षाला रेडीरेकनर दराच्या अडीच टक्के भाडे असेल. भूखंडांचे आरक्षण बदलण्याचा निर्णय झाल्यानंतर आयुक्तांकडून त्यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल.
>
> **– राजेंद्र थोरात,**
> उपअभियंता, मालमत्ता विभाग, पुणे महापालिका

> पीएमआरडीएने बाणेर आणि बालेवाडी भागातील आठ भूखंड महापालिकेकडे मागितले आहेत. महापालिकेकडून यावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे मेट्रो स्थानकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची सुविधा उभारण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे.
>
> **– रामदास जगताप,**
> उपायुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

---

# जागावाटपाबाबत अद्याप कोणताही निर्णय नाही

## कुणालाच तरी नाव पुढे करून मत मागण्याची गरज नाही : पवार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।


**इंडिया आघाडीचे नेतृत्व मल्लिकार्जुन खरगे यांनी स्विकारावं अशी सूचना काही सहकार्यांनी केली, त्याला अनेकांनी संमती देखील दिली. त्याचप्रमाणे संयोजक म्हणून नितीश कुमारांनी जबाबदारी घ्यावी अशी सूचना करण्यात आली होती. परंतु संयोजक पदाची गरज नसल्याचं मत नितीश कुमारांनी मांडलं. त्यामुळे संयोजक पदाची नियुक्ती करण्यात आली नाही, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी दिली.**



एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार असल्याचं शरद पवारांनी या बैठकीनंतर प्रतिक्रिया दिली. इंडिया आघाडीच्या बैठकीचं ऑनलाइन माध्यमातून आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीमध्ये शरद पवार, ममता बॅनर्जी, सोनिया गांधी, राहुल गांधी यांनी देखील हजेरी लावली. अवघ्या काही महिन्यांत लोकसभेच्या निवडणुकांचं बिगुल वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीची ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाच्या संदर्भात ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. परंतु या बैठकीत जागावाटपासंदर्भात काही निर्णय झाला नसल्याचं शरद पवारांनी म्हटलं. जागावाटपाच्या संदर्भात काही वाद आहते, ते मिटवले जावे याबाबत या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती शरद पवारांनी दिली. पुढे त्यांनी म्हटलं की, एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी स्थापन व्हावी अशा सूचना देखील अनेकांनी मांडल्या. आज देशाला पर्याय देण्यासाठी विविध राजकीय पक्ष सत्ताधा-यांच्या विरोध एकत्र येत आहेत. हिच इंडिया आघाडी जमेची बाजू आहे. इंडिया आघाडीमधून पंतप्रधान पदाचा चेहरा कोण असणार यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहेत. यावर शरद पवारांनी म्हटलं की, कुणाचं तरी नाव प्रोजेक्ट करुन त्याच्या नावे मतं मागावी अशी गरज वाटत नाही. आम्हाला विश्वास आहे की, आम्ही देशाला पर्याय देऊ शकतो. मोरारजी देसाई यांचे उदाहरण देत इंडिया आघाडीत सध्या तरी पंतप्रधान पदाचा चेहरा नसावा. "अयोध्येतील श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे, मला त्याचं आमंत्रण आलेलं नाही. मी म्हटलं काही हरकत नाही, पण मी जाणार. मात्र 22 जानेवारीला नाही जाणार, नंतर नक्की जाणार, श्रीराम हे सर्वांचे आहेत, असं शरद पवार म्हणाले आहेत.एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा विचार असल्याचं शरद पवारांनी या बैठकीनंतर प्रतिक्रिया दिली. इंडिया आघाडीच्या बैठकीचं ऑनलाइन माध्यमातून आयोजन करण्यात आलं होतं.

### हिच इंडिया आघाडी जमेची बाजू

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागावाटपाच्या संदर्भात ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. परंतु या बैठकीत जागावाटपासंदर्भात काही निर्णय झाला नसल्याचं शरद पवारांनी म्हटलं. जागावाटपाच्या संदर्भात काही वाद आहते, ते मिटवले जावे याबाबत या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती शरद पवारांनी दिली. पुढे त्यांनी म्हटलं की, एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी स्थापन व्हावी अशा सूचना देखील अनेकांनी मांडल्या.



# रस्त्यांच्या सौंदर्यीकरण व सुरक्षिततेसाठी
# हरित सेतू उपक्रम!

## शहरात रस्ते व सार्वजनिक विकास संदर्भात राष्ट्रीय कार्यशाळा

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरातील रस्त्यांच्या सौंदर्यीकरणाच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरी सहभाग व नावीन्यता यांचा योग्य मेळ घालणे आवश्यक आहे. सार्वजनिक परिसर पादचाऱ्यांसाठी, लहान मुलांसाठी व रहिवाशांसाठी उत्साहवर्धक बनवण्याचा महापालिकेचा उद्देश आहे. त्यासाठी देशातील अनुभवी तज्ज्ञांच्या सहकार्याने आम्ही हरित सेतू नावाचा अभिनव उपक्रम अंमलात आणणार आहोत. त्यासाठी ही कार्यशाळा नक्कीच उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.



स्मार्ट सिटी अभियानांतर्गत शहरी रस्ते व सार्वजनिक परिसर नागरिकांना केंद्रबिंदू मानून विकसित करण्यासाठी देशातील विविध शहरांमध्ये 'शहरी रस्ते व सार्वजनिक परिसर विकास' या राष्ट्रीय कार्यशाळा आकुर्डी येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे आज सुरू झाली. त्या आयुक्त बोलत होते.

या वेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, मनोज सेठीया, उपायुक्त मनोज लोणकर, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, शिरीष पोरेडी, लक्ष्मीकांत कोल्हे तसेच, 43 शहरांमधील स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त उपस्थित होते.

हरित सेतूची शाश्वत अंमलबजावणी करण्यासाठी ग्रीन बॉण्ड व सायकल इन्फ्रास्ट्रक्चर आणि कनेक्टिव्हिटी इम्प्रूव्हमेंट (बीआयसीआय) चा वापर केला जाईल. इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अॅण्ड डेव्हलपमेंट पॉलिसीच्या शाश्वत मोबिलिटीच्या प्रांजली देशपांडे आणि ट्रॅफिक ऑपरेशन्स व्यावसायिक प्रताप भोसले यांसारख्या तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालील सत्रांनी, रस्त्याच्या डिझाइनमध्ये डेटाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. स्मार्ट सिटी सल्लागार अमर करण यांनी कार्यशाळेत प्रभावी स्ट्रीट डिझाईन प्रकल्प राबविण्याच्या गुंतागुंतीवर अभ्यासपुर्ण सादरीकरण केले. त्यांनी धोरणात्मक आव्हाने नमूद करत, कार्यक्षम आणि उपयुक्त रस्ते तयार करण्याच्या दृष्टीकोणांवर भर दिला. विकास ठकार यांनी रस्त्यावरील डिझाईन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आव्हाने कमी करण्यासाठी अंमलात येणार्या धोरणांची माहिती दिली. कार्यशाळेत निखिल कन्स्ट्रक्शन, शिवम इंडस्ट्रीज आणि स्नेह प्रीकास्ट यांच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरात रस्ते सौंदर्यीकरण आणि विकासकामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट, कॉंक्रीटच्या साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले आहे.

> शहरातील नागरिकांमध्ये पायी चालणे, सायकल चालविणे आणि धावणे या दैनंदिन आरोग्यदायी सवयींचे महत्त्व रुजविण्यासाठी तसेच त्यांना प्रोत्साहित करून शहरांमधील उपलब्ध सार्वजनिक पायाभूत सुविधांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध पैलूंवर काम करण्यात येत आहे. त्यामध्ये रस्त्यांचा आणि सार्वजनिक परिसरांचा विकास होणे गरजेचे असून या कार्यशाळेच्या माध्यमातून हे ध्येय साध्य होण्यास नक्कीच मदत मिळेल.
>
> - शेखर सिंह, आयुक्त.

# राष्ट्रवादीची शरद पवार टीम ॲक्टिव्ह

## पोस्टर अनावरण: शहरात होणार "भव्य जिल्हास्तरीय डान्स" स्पर्धा

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस प्रदेशाच्या वतीने संपूर्ण राज्यभर शरद क्रीडा महोत्सव जल्लोषात सुरू आहे.त्याचाच भाग म्हणून पिंपरी चिंचवड शहर युवक राष्ट्रवादीच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी भव्य जिल्हास्तरीय सोलो व ग्रुप डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. एकूण १ लाख रुपयांपर्यंतची रोख बक्षिसे व पारितोषिके तसेच सहभागींना सन्मानपत्र आणि ट्रॉफी देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या पोस्टरचे अनावरण प्रदेशाध्यक्ष जयंत पाटीलसाहेब, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या हस्ते झाले आहे, अशी माहिती युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी दिली.



राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने शहरातील बालगोपाल ते वयोवृद्धांना नृत्यासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे, यासाठी शरद क्रीडा महोत्सव अंतर्गत याचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा सोमवारी (दि.१५) चिंचवडच्या एलप्रो सिटी मॉल येथील तिसऱ्या मजल्यावरील प्रेक्षागृहात होणार असून यात वयाची अट नसणार आहे. त्यामुळे शहरातील बालगोपाल, युवक-युवती, महिलांसह वयोवृद्ध यांनी सहभागी व्हावे, स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी साठी ८६००६६३६६२ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### बक्षीस वितरणाला इंडिया आघाडीची उपस्थिती...

» सोमवारी सायंकाळी सहा वाजता बक्षीस वितरण होणार आहे. बक्षीस वितरण राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे साहेब, राष्ट्रवादीचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम, शिवसेना नेते संजोग वाघेरे, आपचे शहराध्यक्ष चेतन बेंद्रे, शिवसेनेचे शहरप्रमुख सचिन भोसले यांच्या हस्ते होणार आहे.

याचे आयोजन राष्ट्रवादी युवकच्या वतीने शहराध्यक्ष इम्रान भाई शेख, महिला शहराध्यक्ष ज्योती निंबाळकर, प्रदेश संघटक राहुल पवार, कार्याध्यक्ष सागर तापकीर, भोसरी विधानसभा अध्यक्ष संतोष शिंदे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष राहुल बागडे यांनी केले आहे. याचे उदघाटन सकाळी अकरा वाजता राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, मच्छिंद्र तापकीर, राष्ट्रवादी विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांच्या हस्ते होणार आहे.

# ... तर हिंदू राष्ट्र झाल्याशिवाय राहणार नाही : मिलिंद एकबोटे

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

आपला भारत देश जगात जगदगुरू होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे.स्वामी विवेकानंद यांच्या स्वप्नांची परिपूर्ती होत आहे. स्वामीजींचे स्मरण संपूर्ण देशात व्हायला हवे. स्वामीजींच्या विचारांचा जागर झाल्यास भारत हिंदूराष्ट्र निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.असा विश्वास समस्त हिंदू आघाडीचे कार्याध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी व्यक्त केला.

शरद नगर चिखली येथील स्वामी विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने एकबोटे यांना जीवनगौरव पुरस्कार, स्नेहवनचे संचालक अशोक देशमाने यांना स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार , सुधीर धर्माधिकारी यांना भक्त पुंडलिक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ते पुरस्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी कामगार नेते सचिन लांडगे,सुनील लोखंडे, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद,

### विवेकानंद लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान

उपनिबंधक नितीन काळे, अजय पाताडे, सचिन सानप,विष्णू नेवाळे, अध्यक्ष रामराजे बेंबडे, उपाध्यक्ष संतोष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

टाटा मोटर्स युनियन अध्यक्ष सचिन लांडगे म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांनी समाजाला ऊर्जा देण्याचे कार्य केले. स्वामींचा आदर्श घेवून पुरस्कारप्राप्तीकडून हेच कार्य होत आहे. हा आदर्श इतरांनी घेतला पाहिजे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील पंडित, मिलिंद वेल्हाळ, महेश मांडवकर, शंकरराव बनकर, पंढरीनाथ म्हस्के, सुनील पंडीत ,पंढरीनाथ म्हस्के, दिलीप मांडवकर,अशोक हाडके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव कवितके यांनी तर आभार संतोष ठाकूर यांनी केले.

# बेकायदा इमल्यांचे 'कल्याण'




**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील अनधिकृत बांधकांमांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने तेथील प्रशासनाला फटकारले आहे. या शहरामध्ये अनधिकृतपणे बांधल्या गेलेल्या दीड लाख इमारतींबद्दल न्यायालयाने 'या इमारती होईपर्यंत पालिका काय झोपली होती का,' असा सवालही केला आहे.**

खरे तर न्यायालयाने हा प्रश्न कल्याण डोंबिवली महापालिकेसाठी केली असला, तरीही तो महाराष्ट्रातील सर्वच शहरांना आणि गावांना लागू आहे. या सर्वच शहरांतील प्रशासन यंत्रणा या बाबतीत निद्रावस्थेतच आहेत. गेल्या दोन तीन दशकांमध्ये देशातील शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढतो आहे. स्वातंत्र्याच्या वेळेस या देशातील सत्तर टक्के नागरिक हे खेड्यांमध्ये रहात होते. मात्र त्यानंतर रोजगाराच्या संधी, शिक्षण याबरोबरच वेळोवेळी आलेल्या नैसर्गिक आपत्ती, कुटुंबांचा वाढलेला आकार, बेभरवशाची झालेली शेती या सगळ्यामुळे शहराकडे येण्याचे प्रमाण वाढले. जागतिकीकरणानंतर तर हा ओढा प्रचंड वाढू लागला. हा ओघ वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतरही सत्ताधाऱ्यांनी आपल्या धोरणांमध्ये वेळेवर बदल करण्याचे टाळले. या शहरांतील यंत्रणा कोलमडून पडतील, हे लक्षात आल्यावरही त्याला पर्याय निर्माण करण्याचे



कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. पर्यायाने आजची परिस्थिती निर्माण झाली. गेल्या दोन तीन दशकांमध्ये देशातील शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढतो आहे. स्वातंत्र्याच्या वेळेस या देशातील सत्तर टक्के नागरिक हे खेड्यांमध्ये रहात होते. मात्र त्यानंतर रोजगाराच्या संधी, शिक्षण याबरोबरच वेळोवेळी आलेल्या नैसर्गिक आपत्ती, कुटुंबांचा वाढलेला आकार, बेभरवशाची झालेली शेती या सगळ्यामुळे शहराकडे येण्याचे प्रमाण वाढले. जागतिकीकरणानंतर तर हा ओढा प्रचंड वाढू लागला. हा ओघ वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतरही सत्ताधाऱ्यांनी आपल्या धोरणांमध्ये वेळेवर बदल करण्याचे टाळले. या शहरांतील यंत्रणा कोलमडून पडतील, हे लक्षात आल्यावरही त्याला पर्याय निर्माण करण्याचे कोणतेही प्रयत्न झाले नाहीत. पर्यायाने आजची परिस्थिती निर्माण झाली. वास्तविक हे पर्याय तयार करण्याचे काम सरकार व प्रशासन नावाच्या यंत्रणेचे असते. परवडणारी घरे तयार करण्याच्या योजना आखण्याच्या गोष्टी आपण अनेक वर्षे ऐकतो. पण त्या फक्त कागदावरच राहताना आपल्याला दिसतात. मध्येच कधीतरी न्यायालयाने फटकारल्यानंतर संबंधित क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झाले, तर त्याला महापालिका अधिकारी व पोलिस निरीक्षकाला जबाबदार धरण्याचे आदेश जारी काढले जातात. पण या आदेशानुसार आजपर्यंत एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झालेली आपण ऐकलेली नाही. राजकीय पक्ष या वस्त्यांकडे फक्त मतपेट्या म्हणून बघतात. मग दर वेळेस या वर्षीपर्यंतची अनधिकृत बांधकामे अधिकृत केली जातील, अशी आश्वासने देत निवडणुकांचे फड रंगविले जातात. निवडणुका संपल्याकडे सगळेच जण ती आश्वासने विसरतात. अनधिकृतपणे राहणारा आहे तिथेच आणि तसाच राहतो. स्वातंत्र्यानंतरच्या पंचाहत्तर वर्षांमध्ये आपण सुनियोजितपणे किती शहरे वसवली असा प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेही भरणार नाही. पण आहेत ती शहरे किती फुगली, असा प्रश्न विचारला तर जवळपास प्रत्येक शहर अनेक पटींनी वाढले आहे, असेच उत्तर मिळेल. वास्तविक अनधिकृत बांधकामांना फक्त अधिकाऱ्यांना नाही, तर लोकप्रतिनिधींनाही जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्याची तरतूद कायद्यात करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर परवडणाऱ्या अधिकृत घरांची निर्मिती करण्याचे लक्ष्यही ठरवून दिले पाहिजे. रस्त्यावरच्या दिव्यांच्या खांबांना रंगीत माळा लावण्याऐवजी या घरांमध्ये पिण्याचे पाणी व सांडपाण्याच्या विल्हेवाटीच्या व्यवस्थेला अधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे. ज्या दिवशी या प्रकारची सामाजिक मानसिकता आपण कृतीत आणू, त्या दिवशी या प्रश्नांचे उत्तर शोधण्याच्या दिशेने आपण पहिले पाऊल टाकू. या प्रश्नाला अनेक पैलू आहेत. त्या सगळ्याचा विचार करून त्यावर सर्वंकष धोरण आखण्याची गरज आहे. त्यासाठी प्रचंड इच्छाशक्तीची गरज आहे. त्यानंतरच न्यायालयाच्या या नाराजीला काही अर्थ निर्माण होईल. अन्यथा फक्त कागदी घोडे नाचविले जातील. त्याचा उपयोग शून्य असेल.

## संपादकीय »

# अर्थ आणि परमार्थ

***गेल्या काही काळात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासहित प्रमुख वित्तसंस्थांनी भारताच्या विकास वाढीची टक्केवारी ६.३ ते ७ या दरम्यान ठेवली आहे.***

करोनोत्तर काळात भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे. केवळ चालू आर्थिक वर्षातच नव्हे तर पुढील बरीच वर्षे हे चित्र कायम राहण्याची शक्यता आहे. सध्याचे आर्थिक वर्ष लवकरच संपेल. या २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताच्या आर्थिक विकासाचा वेग जगातील एकाही संस्थेने सहा टक्क्यांच्या खाली अनुमानलेला नाही. साऱ्या जगाचा सरासरी वृद्धिदर २.४ वरून २.७ वर जाईल. त्याचवेळी, भारताचा समावेश असणाऱ्या दक्षिणा आशियाचा वृद्धिदर या कॅलेंडर वर्षात ५.२ असेल. जगाच्या सरासरीपेक्षा हा आकडा जवळपास दुप्पट असण्याचे कारण भारताची घोडदौड हेच आहे. गेल्या काही काळात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्यासहित प्रमुख वित्तसंस्थांनी भारताच्या विकास वाढीची टक्केवारी ६.३ ते ७ या दरम्यान ठेवली आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकास कामांच्या उद्घाटनाबाबत एक वेगळीच रीत अवलंबली आहे. विशेषतः, दुसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर ती अधिक प्रमाणात दिसून येत आहे. ती म्हणजे, एकाचवेळी अनेक योजनांचे उद्घाटन, भूमिपूजन, शिलान्यास किंवा निदान अंशतः परिचालन करायचे.**

# पंतप्रधान मोदी : विकासाची प्रचारमोहीम

अशा सगळ्या कामांची बेरीज शेकडो, काही वेळा हजारो कोटी रुपयांच्या घरात जाते. या सगळ्याचा एकत्रित परिणाम होत असतो. त्यातच, मोदी यांच्या स्वतःच्या आग्रहामुळे अनेक प्रलंबित योजना मार्गी लागल्या. त्यामुळे, मोदी यांनीच भूमिपूजन केलेल्या योजना पुऱ्या होऊन त्यांचे उद्घाटन करण्याचा योगही त्यांनाच येतो. त्यांच्या या धडाकेबाज आणि आग्रही कार्यपद्धतीमुळे कामे वेगाने पुरी होत आहेत. शुक्रवारी नरेंद्र मोदी जेव्हा महाराष्ट्रात आले; तेव्हा 'अटल सेतू'सारख्या महत्त्वाकांक्षी पुलाचे उद्घाटन तर झालेच; पण लोकसभेच्या निवडणुकांच्या प्रचाराचा नारळ न फोडताच फुटला आहे. नाशिकमधला 'रोड शो' किंवा नवी मुंबईतील सभास्थानी उघड्या गाडीतून स्वागताचा स्वीकार करीत येणे, ही प्रचार सुरू झाल्याची स्पष्ट खूण आहे. शुक्रवारचे कार्यक्रम पाहिले तर एकीकडे नाशिक या दक्षिण काशी म्हणविल्या जाणाऱ्या तीर्थस्थळी काळाराम मंदिरातील



पूजन, भजन आणि काही तासांतच हजारो कोटींच्या योजनांचे उद्घाटन आणि भूमिपूजन; यातून मोदी यांनी एकाचवेळी दोन आघाड्या उघडल्या आहेत. तशा त्यांनी त्या या आधीच उघडल्या आहेत. कर्कश्श व कंठाळी भाषणे न करता एकीकडे हिंदुत्वाचा शिगोशीग परिवेष व आविष्कार आणि दुसरीकडे, जनसामान्यांच्या हिताच्या योजनांची बरसात, असे हे मोदी यांचे दुधारी शस्त्र आहे. आता लोकसभेच्या प्रचारात ते कसे सफाईने वापरायला हवे, याचे जणू प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक मोदी यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिवसभर आपल्यासोबत ठेवून दिले आहे. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमावर स्वाभिमानी बहिष्कार घालणारे विरोधक मोदींचा हा दुहेरी झंझावात कसा काय परतवणार आहेत, अशी शंका निर्माण करणारा हा शुक्रवारचा महाराष्ट्रदौरा होता. नरेंद्र मोदी यांचा जन्म १९५० चा आहे. ७३ वर्षांचे पंतप्रधान आणि नाशिकमध्ये युवा महोत्सवात त्यांच्यासमोर असणारी तरुणाई यांच्यात अडीच ते तीन पिढ्यांचे अंतर होते. इतके अंतर कापून संवाद साधणे सोपे नाही. पालकांनाही घरात ते जमत नाही. मात्र, मोदी यांनी 'हा नवीन भारत उद्या तुमच्या ताब्यात असणार आहे आणि तुमच्याचसाठी आज आम्ही तो घडवत आहोत,' असे म्हणून हे अंतर एकदम कापून टाकले. 'आई आणि बहीण यांच्यावरून एकमेकांना अपशब्द वापरू नका,' हा त्यांचा सल्ला घरातल्या एखाद्या वडीलधाऱ्यासारखा होता. तो त्यांनी यापूर्वीही एकदा जाहीरपणे दिला होता. हा सल्ला किती महत्त्वाचा आहे, हे रस्त्यावर कान उघडे ठेवून फिरणाऱ्या कुणालाही लगेचच पटेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माझ्या दाढीत अनेकांच्या नाड्या!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची कवितेतून कोपरखळी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माझ्या दाढीत अनेकांच्या नाड्या आहेत, दाढीवर हात फिरवला की अनेकांना धास्ती वाटते अशी कोपरखळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (EKNATH SHINDE) यांनी आज विरारमध्ये जागतिक मराठी संमेलनाच्या भाषणात केल्या. साहित्य आणि मराठी माणसाविषयी बोलताना त्यांनी राजकीय विरोधकांवर ही निशाणा साधला.**



विरारमध्ये आयोजित जागतिक मराठी संमेलनाच्या भाषणाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कविता करत फटकेबाजी केली. रामदास फुटाणे यांनी शिंदेंवर केलेली कविता वाचली, "दाढीवर हात फिरवीत त्यांनी केला संकल्प, 50 आमदारांचं पुनर्वसन हाच यांचा प्रकल्प," ही कविता सांगत दीड वर्षापूर्वी केलेल्या बंडाच्या आठवणी ताजा केल्या. हे करायला हिंमत लागते, जिगर लागतो असं सांगतं 50 आमदार, 13 खासदार आणि लाखो कार्यकर्त्यांनी ठेवलेला विश्वास सार्थ करायला लागेल, त्यांना जपायला लागेल असंही सांगितलं. "यह है दाढी की किमया, दुष्टों का कर दिया सफाया" ही कविता म्हणत या दाढीमध्ये बऱ्याच लोकांच्या नाड्या आहेत, नाडी परीक्षण करावं लागतं. आमदार हितेंद्र ठाकूरांनाही ते माहीत आहेत अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना चिमटा काढला. त्यानंतर आणखी एक कविता म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या आघाडी सरकारचं कौतुक केलं. आमची थोड्याच दिवसांमध्ये महाराष्ट्रात पसरली कीर्ती, कारण आमचं सरकार म्हणजे आम्ही आहोत त्रिमूर्ती," पुन्हा दाढीचा धागा पकडत एकनाथ शिंदे म्हणाले की, मी दाढीवर हात फिरवला तरी कुणाचा घात करत नाही, ही माझ्या कामाची पध्दत आहे. सध्या खालच्या पातळीवर सुरु असलेल्या राजकारणाबाबत चिंता व्यक्त करताना, उपदेशासाठी कविता करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी रामदास फुटाणे यांना केलं. तर काहींच्या सकाळी 9 वाजताच कविता चालू होतात, अशी कोपरखळी त्यांनी संजय राऊत यांच नाव न घेता लगावली. जागतिक मराठी संमेलनानंतर मुख्यमंत्री विरारच्या क्लब वन येथे कार्यकर्ता मेळाव्याला गेले होते. तेथे पालघर मध्ये झालेल्या साधु हत्याकांडातील मयत साधुंच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत केली. शिवसेनेच्या या मेळाव्यात साधुंच्या कुटुंबीयांची मुखमंत्र्यांनी भेट घेतली आणि मदतही देण्यात आली. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्यांदाच वसई विरार मध्ये शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. नुकतीच शिवसेनेला मान्यता मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह जोरात होता. यावेळी एकनाथ शिंदे यांनी 'घर तिथे शिवसेना, आणि गाव तिथे शिवसेना' असे घोषणा त्यांनी देऊन कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन केले. तीन वर्षापूर्वी पालघरमध्ये साधुंची हत्या करण्यात आली होती. या साधुंच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. या मेळाव्यात त्या कुटुंबीयांचा सन्मानही करण्यात आला. यापूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी साधुंच्या कुटुंबीयांना भेटही नाकारली होती. मात्र आमची खरी शिवसेना असल्याने आम्ही साधुसंतांचा सन्मान करतो असे शिंदे यांनी यावेळी सांगितले. विरारमध्ये आयोजित जागतिक मराठी संमेलनाच्या भाषणाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कविता करत फटकेबाजी केली. रामदास फुटाणे यांनी शिंदेंवर केलेली कविता वाचली, "दाढीवर हात फिरवीत त्यांनी केला संकल्प, 50 आमदारांचं पुनर्वसन हाच यांचा प्रकल्प," ही कविता सांगत दीड वर्षापूर्वी केलेल्या बंडाच्या आठवणी ताजा केल्या.

### कार्यकर्त्यांचा उत्साह जोरात

» मी दाढीवर हात फिरवला तरी कुणाचा घात करत नाही, ही माझ्या कामाची पध्दत आहे. सध्या खालच्या पातळीवर सुरु असलेल्या राजकारणाबाबत चिंता व्यक्त करताना, उपदेशासाठी कविता करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी रामदास फुटाणे यांना केलं. तर काहींच्या सकाळी 9 वाजताच कविता चालू होतात, अशी कोपरखळी त्यांनी संजय राऊत यांच नाव न घेता लगावली. जागतिक मराठी संमेलनानंतर मुख्यमंत्री विरारच्या क्लब वन येथे कार्यकर्ता मेळाव्याला गेले होते. तेथे पालघर मध्ये झालेल्या साधू हत्याकांडातील मयत साधूंच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत केली. शिवसेनेच्या या मेळाव्यात साधूंच्या कुटुंबीयांची मुखमंत्र्यांनी भेट घेतली आणि मदतही देण्यात आली. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्यांदाच वसई विरार मध्ये शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. नुकतीच शिवसेनेला मान्यता मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह जोरात होता. यावेळी एकनाथ शिंदे यांनी 'घर तिथे शिवसेना, आणि गाव तिथे शिवसेना' असे घोषणा त्यांनी देऊन कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आवाहन केले.

# ठाकरे पिता-पुत्रांनी कल्याणमधून जिंकून दाखवावं

## 2014 मध्ये यांना उमेदवार मिळत नव्हता : खा. श्रीकांत शिंदे

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एक वेळ अशी होती की कल्याणमध्ये यांना उमेदवार मिळत नव्हता, त्या परिस्थितीत या ठिकाणी मी निवडणूक लढवली आणि जिंकली, त्यावेळी जर लोकांशी संपर्क ठेवला असता तर आता यांना गल्लोगल्ली फिरावं लागलं नसते अशी जहरी टीका शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली. ठाकरे पिता-पुत्रांनी कल्याणमधून निवडणूक लढवावी आणि जिंकून दाखवावी असं आव्हानही त्यांनी दिलं.**

उद्धव ठाकरे यांनी आज कल्याण-डोंबिवलीचा दौरा केला, त्यावर श्रीकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, 2014 मध्ये यांना उमेदवार मिळत नव्हता, तेव्हा शिवसेनेचा खासदार जो आहे पार्टी सोडून गेला होता. तेव्हा कल्याण लोकसभेची जागा कशी निवडून आणायची हा एक प्रश्न उपस्थित होत होता. त्यावेळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुठलाही विचार न करता मला उभं केलं. त्या विपरीत परिस्थितीमध्ये ही निवडणूक लढलो, त्याचे साक्षीदार तुम्ही आहात. तेव्हा यांना कुठलाही उमेदवार मिळत नव्हता, तेव्हा त्यांनी विचार केला नाही. ठाकरे पिता पुत्रांनी कल्याण लोकसभेमधून निवडणूक लढवावी असं आव्हान देताना डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, त्यांना जिथून लढायचे तिथून लढावं, कोपरीमधून लढायचे, कल्याणमधून लढायचे, मी तर म्हणतोय दोघांनीही लढा. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी कल्याणमधून लढावं आणि जिंकून दाखवावं. त्यासाठी देखील आम्ही तयार आहोत आपल्या घरातील कोणाला तरी उभं केले पाहिजे, प्रचारासाठी जेवढी ताकद लावायची तेवढी ताकद लावली पाहिजे असं त्यावेळी ठाकरे म्हणाल्याचं श्रीकांत शिंदे यांनी सांगितलं. ते म्हणाले की, तेव्हा ही जागा आपल्याला जिंकून आणायची होती. 2014 झाली, 2019 ला साडेतीन लाखाच्या फरकाने लोकांनी निवडून दिले. आता 2024 येत आहे, तेव्हा तुम्ही काउंट करा किती लाखाच्या फरकाने निवडून देतील. आमच्याकडे घराणेशाही नाही. जेव्हा पार्टीला गरज लागली तेव्हा आम्ही उभा राहिलो, विपरीत परिस्थितीमध्ये कल्याणची सीट आम्ही निवडून आणली.





### त्याचे साक्षीदार तुम्ही आहात

» खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, 2014 मध्ये यांना उमेदवार मिळत नव्हता, तेव्हा शिवसेनेचा खासदार जो आहे पार्टी सोडून गेला होता. तेव्हा कल्याण लोकसभेची जागा कशी निवडून आणायची हा एक प्रश्न उपस्थित होत होता. त्यावेळेस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुठलाही विचार न करता मला उभं केलं. त्या विपरीत परिस्थितीमध्ये ही निवडणूक लढलो, त्याचे साक्षीदार तुम्ही आहात. तेव्हा यांना कुठलाही उमेदवार मिळत नव्हता, तेव्हा त्यांनी विचार केला नाही.

# निर्यातीवरील बंदी कायम राहणार!

## » निर्यातबंदी हटवण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव नाही : गोयल

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात खाद्यपदार्थांच्या किमती वाढू नयेत, यासाठी सरकारनं अनेक वस्तूंच्या निर्यातीवर निर्बंध (EXPORT BAN) लादले आहेत. अशातच आता वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल (PIYUSH GOYAL) यांनी या वस्तूंच्या निर्यातीवरील बंदी कायम राहणार असल्याचे सांगितले आहे. गहू, तांदूळ आणि साखरेच्या निर्यातीवरील बंदी उठवली जाणार नाही, अशी माहिती मंत्री पियुष गोयल यांनी दिली आहे. अर्थसंकल्पापूर्वीच सरकारनं ही मोठी घोषणा केली आहे.**

गहू, तांदूळ आणि साखरेवरील निर्यातबंदीबाबत सरकारने पुन्हा एकदा परिस्थिती स्पष्ट केली आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी स्पष्टपणे सांगितले की, या खाद्यपदार्थांच्या निर्यातीवरील बंदी सध्या उठवली जाणार नाही. केंद्र सरकार अशा कोणत्याही प्रस्तावावर विचार करत नाही. देशात गहू आणि साखरेची पुरेशी उपलब्धता असल्याचेही ते म्हणाले. त्याच्या आयातीची गरज भासणार नाही असंही त्यांनी सांगितले. केंद्र सरकारकडे निर्यातबंदी हटवण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव नाही. देशांतर्गत मागणीमुळं गहू, तांदूळ आणि साखरेच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आल्याचे पियुष गोयल यांनी सांगितले. आमच्याकडे त्यांची उपलब्धता पुरेशा प्रमाणात आहे. आमच्या देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्हाला त्यांची आयात करण्याचीही गरज नसल्याचे गोयल म्हणाले. भारताने मे 2022 मध्ये गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. यानंतर जुलै 2023 मध्ये गैर-बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली. याशिवाय ऑक्टोबर 2023 मध्ये साखर निर्यातवरही बंदी घालण्यात आली होती. देशातील वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने ही पावले उचलली होती. याशिवाय भारत आटा आणि भारत दालही स्वस्त दरात बाजारात



उपलब्ध करून देण्यात आली आहे. निर्यातीवर बंदी असतानाही भारताने आपले मित्र देश इंडोनेशिया, सेनेगल आणि गांबिया यांना तांदूळ पुरवला आहे. निर्यातीवरील बंदी उठताच त्यांच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता असल्याचे गोयल यांनी सांगितले. सरकार 19 ते 23 रुपये प्रतिकिलो दराने शेतकऱ्यांकडून मुबलक प्रमाणात कांदा खरेदी करत आहे. कांद्याचे भाव वाढल्यानंतर त्याच्या निर्यातीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली होती. किरकोळ चलनवाढीचा दर डिसेंबर 2023 मध्ये 5.69 टक्क्यांवर गेला आहे. हा जर चार महिन्यांतील उच्चांकीवर पोहोचला आहे. कमी पावसामुळं गहू, तांदूळ आणि ऊसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळं मैदा, तांदूळ, साखर महाग होऊ लागली आहे. यावर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमुळं देशांतर्गत बाजारपेठेत या वस्तूंची उपलब्धता वाढावी, यासाठी सरकारने या वस्तूंची निर्यात तातडीने बंद केली होती. मात्र, सरकारच्या या निर्णयाचा निर्यातीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.केंद्र सरकारकडे निर्यातबंदी हटवण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव नाही. देशांतर्गत मागणीमुळं गहू,

### ऊस उत्पादनावर परिणाम

» . किरकोळ चलनवाढीचा दर डिसेंबर 2023 मध्ये 5.69 टक्क्यांवर गेला आहे. हा जर चार महिन्यांतील उच्चांकीवर पोहोचला आहे. कमी पावसामुळं गहू, तांदूळ आणि ऊसाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळं मैदा, तांदूळ, साखर महाग होऊ लागली आहे. यावर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमुळं देशांतर्गत बाजारपेठेत या वस्तूंची उपलब्धता वाढावी, यासाठी सरकारने या वस्तूंची निर्यात तातडीने बंद केली होती. मात्र, सरकारच्या या निर्णयाचा निर्यातीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

तांदूळ आणि साखरेच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आल्याचे पियुष गोयल यांनी सांगितले. आमच्याकडे त्यांची उपलब्धता पुरेशा प्रमाणात आहे. आमच्या देशांतर्गत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्हाला त्यांची आयात करण्याचीही गरज नसल्याचे गोयल म्हणाले. भारताने मे 2022 मध्ये गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. यानंतर जुलै 2023 मध्ये गैर-बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली. याशिवाय ऑक्टोबर 2023 मध्ये साखर निर्यातीवरही बंदी घालण्यात आली होती. देशातील वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारने ही पावले उचलली होती. याशिवाय भारत आटा आणि भारत दालही स्वस्त दरात बाजारात उपलब्ध करून देण्यात आली आहे. निर्यातीवर बंदी असतानाही भारताने आपले मित्र देश इंडोनेशिया, सेनेगल आणि गांबिया यांना तांदूळ पुरवला आहे. निर्यातीवरील बंदी उठताच त्यांच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता असल्याचे गोयल यांनी सांगितले. सरकार 19 ते 23 रुपये प्रतिकिलो दराने शेतकऱ्यांकडून मुबलक प्रमाणात कांदा खरेदी करत आहे. कांद्याचे भाव वाढल्यानंतर त्याच्या निर्यातीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली होती.

# काँग्रेसने आपली कमजोरी स्वीकारली पाहिजे!

## » रंजन चौधरी यांचे जागावाटपाबाबत विधान

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंडिया आघाडीच्या डिजिटल बैठकीपासून दूर राहिलेल्या तृणमूल काँग्रेसने आज शनिवारी (13 जानेवारी) वचनबद्धता व्यक्त केली. काँग्रेसने पश्चिम बंगालमधील मर्यादा ओळखून येथील राजकीय लढाईचे नेतृत्व टीएमसीला करू द्यावे, असेही म्हटले आहे. आघाडी मजबूत करण्यासाठी, जागावाटपाचा फॉर्म्युला तयार करण्यासाठी आणि विरोधी पक्षांच्या आघाडीचा समन्वयक नेमण्याबाबत निर्णय घेण्यासाठी विरोधी इंडिया आघाडीतील घटक पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी चर्चा केली.**



इंडिया आघाडीच्या समर्पणावर भर देताना, टीएमसी खासदार म्हणाले की, "आम्ही इंडिया आघाडीसाठी वचनबद्ध आहोत आणि भारतीय जनता पक्षाचा (भाजप) पराभव करण्यासाठी एकत्र काम करू इच्छितो. तथापि, काँग्रेस नेतृत्वाने मर्यादा स्वीकारल्या पाहिजेत अशी आमची मनापासून इच्छा आहे. आणि त्यांच्या पश्चिम बंगाल युनिटमधील कमकुवतपणा स्वीकारून आम्हाला (TMC) राज्यातील लढ्याचे नेतृत्व करूया. टीएमसीने सांगितले की, "मुख्यमंत्री ममता बॅनर्जी डिजिटल मीटिंगला उपस्थित राहू शकणार नाहीत. कारण त्या त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमांमध्ये व्यस्त आहेत आणि 16 तास अगोदर कळवूनही त्यांना वेळापत्रक बदलता आले नाही. ते म्हणाले की, "आम्हाला सांगण्यात आले होते की इतर कोणीही यात सहभागी होऊ शकत नाही कारण इंडिया आघाडीच्या प्रत्येक घटक पक्षातील एका व्यक्तीला त्यात सहभागी होण्याची परवानगी आहे." तत्पूर्वी, टीएमसीने आगामी लोकसभेत आपल्या पूर्वीच्या भूमिकेचा हवाला दिला. निवडणुकीसाठी जागावाटपाबाबत काँग्रेसच्या राष्ट्रीय आघाडी समितीसोबतच्या बैठकींना प्रतिनिधी पाठवण्यास नकार दिला होता. ज्याची माहिती त्यांनी काँग्रेसला दिली होती. 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या आधारे टीएमसीने पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसला दोन जागांची ऑफर दिली होती. मात्र, काँग्रेसने हा प्रस्ताव अपुरा मानला. गेल्या आठवड्यात, टीएमसी खासदार सुदीप बंदोपाध्याय यांनी काँग्रेसला सहकार्य करण्याची पक्षाची इच्छा दर्शविली होती, परंतु जर चर्चा अयशस्वी झाली तर पक्ष एकट्याने निवडणूक लढवेल.

# स्वीगीच्या चिकनमध्ये निघाला धातूचा तुकडा

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

सध्या ऑनलाईनचे युग आहे. कपडे, वस्तू खरेदी बरोबरच आपण खाण्याचे पदार्थही ऑनलाईन पद्धतीने मागवत असतो. शिवाय, काही कंपन्या ऑनलाईन पद्धतीने ऑर्डर (ONLINE SHOPPING) दिल्यानंतर ताबडतोब खाण्याचे पदार्थ आपल्या पत्त्यावर पोहोचवतात. त्यांच्याकडे स्वच्छताही असते. त्यामुळे आपला कल ऑनलाईन अन्न पदार्थ मागण्याकडे वाढला आहे. मात्र, बंगळुरमधून एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. एका व्यक्तीने स्वीगीकडून (SWIGGY) चिकन मागवले असता त्यातून धातूचा तुकडा निघाला आहे. त्यामुळे तरुण चांगलाच हैराण झाला होता. त्याने स्वीगीला याबाबत जाब विचारला आहे. बंगळुरमध्ये एका व्यक्तीने ऑनलाईन पद्धतीने ऑर्डर स्वीकारणाऱ्या स्वीगी (SWIGGY) या कंपनीकडून चिकन मागवले. मात्र चिकन खाताना तो चांगलाच हैराण झाला. त्याच्या खाण्यात चिकनच्या हाडाऐवजी धातूचा तुकडा निघाल्याने तो चांगलाच हैराण झाला. त्यानंतर या व्यक्तीने संबंधित कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडे याबाबत तक्रार केली. दरम्यान चिकनमध्ये धातूचा तुकडा निघाल्यामुळे चिडलेल्या व्यक्तीने हा प्रकार सोशल मीडियावर शेअर केला. बघताबघता हा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झालाय. स्वीगीकडून (SWIGGY) पीडीत झालेल्या व्यक्तीने धातूचा तुकडा निघालेल्या चिकनचा फोटो सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला आहे.

# राखीला अटक होण्याची शक्यता

बॉलिवूडची 'ड्रामा क्वीन' राखी सावंत (RAKHI SAWANT) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. पण आता अभिनेत्रीच्या अडचणीत वाढ झाली आहे. 'ड्रामा क्वीन' राखी सावंतला कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते. अभिनेत्रीला अटकपूर्व जामीन देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केल्याप्रकरणी विभक्त पती आदिल खान दुर्रानीने (ADIL KHAN DURRANI) राखी सावंत विरोधात तक्रार दाखल केली होती. पण आता ड्रामा क्वीनला अटकेपासून दिलासा देण्यास दिंडोशी सत्र न्यायालयाने नकार दिला आहे. अभिनेत्री राखी सावंत सोशल मीडियावर चांगलीच ॲक्टिव्ह आहे. काही दिवसांपूर्वी तिने विभक्त पती आदिल खान दुर्रानीचा एक खासजी आणि आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला होता. बदनामी करण्याच्या हेतूने राखीने व्हिडीओ शेअर केल्याचा दावा आदिलने केला होता. आदिल दुर्राणीने राखी सावंत विरोधात अंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आदिलच्या तक्रारीनुसार पोलिसांनी राखी सावंतवर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अभिनेत्रीने अटकपूर्व जामिनासाठी दिंडोशी न्यायालयात धाव घेतली. आपल्याला खोट्या प्रकरणात सामील केले जात असून त्रास देण्याच्या उद्देशाने गुन्हा दाखल केल्याचा दावा 'ड्रामा क्वीन'ने केला होता. पण राखीने अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज दिंडोशी न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीकांत भोसले यांनी फेटाळला आहे.

# तेजस्विनी पंडित साकारतेय 'स्वराज्य कनिका

राष्ट्रमाता, राजमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले... यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून या मुलुखाला छत्रपती शिवाजी महाराज दिले .बुद्धिमत्ता, चातुर्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी, कुशल राजनिती, कुटुंबवत्सल असे सगळेच गुण त्यांच्यात होते. शिवबाचे शिवराय घडवताना या माऊलीने अनेक वादळं पेलली. पण, या वादळात ही तेजस्वी ज्योत आणखी प्रखर झाली. प्रत्येक कसोटीवर खऱ्या उतरून या माऊलीने स्त्रीशक्ती व मातृशक्तिचे चिरंतन उदाहरण आपल्या सर्वांस दिले. जगाला दिशा देणाऱ्या या जगत्जननीच्या आयुष्यावर आधारित 'स्वराज्य कनिका जिजाऊ' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच 'स्वराज्य कनिका जिजाऊ' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटात जिजाऊंची भूमिका मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडित ( TEJASWINI PANDIT ) साकारणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर झळकले असून राजमाता जिजाऊ यांची करारी मुद्रा यात दिसत आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अनुजा देशपांडे या करत आहेत. दिग्दर्शिका अनुजा देशपांडे म्हणाल्या की, "राजा नंतर घडतो, आधी घडते ती राजमाता" राजमाता जिजाऊसाहेब या लोकजीवनाला जोडणारी अस्मिता तर आहेतच पण त्याचबरोबर मराठी माणसाला त्याच्या अस्तित्वाची-सामर्थ्याची जाणीव करून देणारी एक शक्ती आहेत. हा अभिमान व जाणीव उराशी बाळगून वीरकन्या ते वीरमातेच्या जीवनकाळचे कथानक २-२.३० तासात मांडणे एक लेखिका म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक होते.

# तमन्ना महेश बाबू एकत्र



बॉलिवूडच्या झगमगत्या जगात भारतातील स्टार तमन्ना भाटिया आणि महेश बाबू ही डायनॅमिक जोडी एकत्र स्पॉट झाली. एका सेट वर हे दोघ एकत्र सोबत दिसले हे क्षण काही लोकांनी कॅप्चर केले आणि ज्यामुळे चाहते आणि फिल्म इंडस्ट्रीत एक वेगळा उत्साह निर्माण झाला आहे. लोकांमध्ये वेगळीच उत्सुकता या नंतर बघायला मिळतेय. अपवादात्मक ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीसाठी ओळखल्या जाणाऱ्या या जोडीने यापूर्वी यशस्वी प्रोजेक्ट्स केले आहेत. आता हे दोघे पुन्हा एकत्र काम करणार का? काही नव्या प्रोजेक्टमध्ये सोबत दिसणार का? अशा प्रश्नांना उधाण आलं आहे. व्हायरल फोटो आश्वासक ऊर्जा आणि इंडस्ट्रीतसोबत सहकार्याबद्दल अंदाज व्यक्त करत आहेत. सूत्रांनुसार "तमन्ना आणि महेशची केमिस्ट्री जादुई आहे प्रत्येक सोबतीचा प्रोजेक्ट्स सिनेमॅटिक अनुभव देणारा असतो यात शंका नाही. त्यांच्या येणाऱ्या प्रकल्पाचे तपशील गोपनीय असून येणाऱ्या काळात हे दोघे सोबत काम करतील. "सोशल मीडियावर याची अधिकृत घोषणा होण्याची सगळेच आतुरतेने वाट पाहत आहेत. तमन्ना भाटिया आणि महेश बाबू यांच्या सहकार्याभोवती सुरू असलेल्या चर्चांना उधाण तर आलं आहे आणि सिनेमॅटिक अनुभव अनुभवयाला सगळेच उत्सुक आहेत.

# मिस्ट्री मॅनसोबत दिसली ड्रामाक्वीन



बॉलीवूड ड्रामाक्वीन कंगना राणौत मुंबईतील सलूनमधून बाहेर पडताना दिसली. यावेळी अभिनेत्री एका मिस्ट्री मॅनसोबत (KANGANA RANAUT WITH MYSTERY MAN) होती. यावेळी कंगनने अतिशय सुंदर स्काय ब्लू कलरचा स्कर्ट तसेच गॉगल घातला होता. तिच्यासोबत दिसणारा रहस्यमय माणूस हा परदेशी होता. दोघेही एकमेकांचे हात घट्ट पकडून सलूनच्या बाहेर आले. त्यानंतर हे फोटो वणव्यासारखे व्हायरल झाले. मिस्ट्री मॅनसोबत अभिनेत्री कंगनाचे हे फोटो पाहून लोक या फिल्म स्टारच्या लिंकअपबद्दल अंदाज बांधताना दिसत आहेत. कंगना मिस्ट्री मॅनसोबत सलूनमधून बाहेर पडताना दिसल्यानंतर लिंकअपच्या बातम्या तीव्र झाल्या. यावेळी या मिस्ट्री मॅनने अभिनेत्री कंगना राणौतचा हात घट्ट पकडला होता. दोघेही चाहत्यांना कपल वाइब्स देताना दिसले. हे फोटो पाहिल्यानंतर सर्वजण अंदाज लावत आहेत की अभिनेत्री कंगना रणौत परदेशी पुरुषाच्या प्रेमात पडली आहे. चित्रपट स्टार कंगना राणौत या मिस्ट्री मॅनसोबत जोडी करताना एकदम परफेक्ट दिसत होती. दोघांचे हे फोटो येताच व्हायरल होऊ लागले. यावेळी पापाराझी पाहून अभिनेत्री कंगना राणौतला लाज वाटू लागली. अभिनेत्रीचे हे फोटोज वाऱ्यासारखे व्हायरल होत आहेत. अनेकदा मीडिया कर्मचाऱ्यांशी मोकळेपणाने बोलणारी अभिनेत्री कंगना रणौत यावेळी पापाराझींना टाळताना दिसली. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो पाहून तिचे चाहते यावेळी खूप खूश आहेत. या फोटोंवर कमेंट करताना लोकांनी लिहिले, 'राणीला राजा मिळाला आहे.' कंगनाचे तिच्या मिस्ट्री मॅनसोबतचे हे फोटो पाहिल्यानंतर अनेक लोक अंदाज लावत आहेत की ही अभिनेत्री लवकरच लग्न करू शकते. अभिनेत्री कंगना राणौतचे हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहेत. लोक या फोटोंवर जोरदार कमेंट करत आहेत.

# 'ॲनिमल'मुळे तृप्तीला मिळाली लोकप्रियता

संदीप रेड्डी वंगा (SANDEEP REDDY VANGA) दिग्दर्शित ॲनिमल (ANIMAL) या चित्रपटामुळे अभिनेत्री तृप्ती डिमरीला (TRIPTI DIMRI) विशेष लोकप्रियता मिळाली. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले. ज्यामध्ये तृप्ती ही ओरीसोबत फोटोसाठी पोज देताना दिसली. AJIO LUXE WEEKEND या इव्हेंटला तृप्ती आणि ओरीनं हजेरी लावली. यावेळी ओरी हा ब्लू डेनिम पँट आणि ऑरेंज टीशर्ट अशा लूकमध्ये दिसला. तर तृप्ती ही पिवळ्या रंगाचा ड्रेस, सिल्वर कलरचे फुटवेअर आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसली. ओरी आणि तृप्तीनं फोटोसाठी एकत्र पोज दिल्या. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये दिसले की, ओरी हा तृप्तीला मिठी मारतो त्यानंतर तो तिच्या गालावर किस करतो. ओरी आणि तृप्तीच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. एका नेटकऱ्यानं व्हिडीओला कमेंट केली, बॉलिवूडमधील अनेक जण ओरीचे फॅन्स आहेत. तृप्ती डिमरीला ॲनिमल या चित्रपटामुळे विशेष लोकप्रियता मिळाली. ॲनिमल हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीरच्या इंटिमेट सीन्सची चर्चा सोशल मीडियावर झाली. एका मुलाखतीमध्ये तृप्तीनं ॲनिमल चित्रपटातील इंटिमेट सीन्सबद्दल सांगितलं. ती म्हणाली, " सेटवर फक्त चार-पाच लोक होते. दर पाच मिनिटांनी ते सर्व लोक मला विचारत होते, 'तू ठीक आहेस ना?' तुला काही हवे आहे का? तुला कम्फर्टेबल वाटत आहे का?' ॲनिमल या चित्रपटाच्या आधी तृप्तीनं 'बुलबुल' आणि 'कला' या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. ओरीचं खरं नाव ओरहान अवत्रामणी असं आहे. ओरी हा विविध बॉलिवूड पार्ट्यांमधील फोटो सोशल मीडियावर शेअर करतो. या फोटोमध्ये ओरी आणि बॉलिवूडमधील अनेक कलाकार दिसतात. ओरी नेमकं काय काम करतो? त्याची लाईफस्टाईल कशी आहे? या सर्व गोष्टींबाबत जाणून घेण्यास नेटकरी उत्सुक असतात.या चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीर कपूरच्या इंटिमेट सीन्सनं अनेकांचे लक्ष वेधले. सध्या ॲनिमलचा सक्सेस एन्जॉय करत असणाऱ्या तृप्तीनं काही दिवसांपूर्वी एका इव्हेंटला हजेरी लावली. या इव्हेंटमधील तृप्तीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच या इव्हेंटमधील एका व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले.

# सिद्धूने पटकावले रौप्य पदक!

## ऑलिम्पिकसाठी कोटा मिळवणारा ठरला 17 वा भारतीय खेळाडू

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विजयवीर सिद्धूने नेमबाजीत भारताला १७ वा ऑलिम्पिक कोटा मिळवून दिला. याआधी भारताचे इतके खेळाडू नेमबाजीत पात्र झाले नव्हते. यापूर्वी २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये १५ नेमबाजांनी भाग घेतला होता. विजयवीरने शनिवारी आशियाई ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूलमध्ये रौप्य पदक जिंकले. या वर्षी जुलै महिन्यात पॅरिस, फ्रान्स येथे स्पर्धा होणार आहे.**




५७७ गुणांसह, विजयवीर सिद्धूने पात्रता फेरीत पाचवे स्थान मिळवले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. कझाकची नेमबाज निकिता चिर्युकिन, रिपब्लिक ऑफ कोरियाचा सॉंग जोंग-हो, सुकजिन हॉंग आणि जेक्युन ली आणि जपानची दाई योशिओका हे इतर नेमबाज होते ज्यांनी पदक फेरीत प्रवेश केला. गेल्या वर्षी हांगझो आशियाई क्रीडा स्पर्धेत सांघिक कांस्यपदक जिंकणारा २१ वर्षीय खेळाडू पॅरिस कोटा मिळवण्यात त्याचा सहकारी अनिश भानवालासोबत सामील झाला आहे. अनिशने यापूर्वी कांस्यपदकासह ऑलिम्पिक कोटा निश्चित केला होता. अनिशने यापूर्वी गतवर्षी कोरियातील चँगवॉन येथे झालेल्या आशियाई चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदकासह ऑलिम्पिक कोटा मिळवला होता. मात्र, विजयवीरला पदकांवर अवलंबून राहावे लागले नाही; त्याने ५७७ गुणांसह चौथ्या स्थानावर अंतिम फेरीसाठी पात्र ठरून कोटा मिळवला. अंतिम फेरीत, जेथे सहा अंतिम फेरीतील चार कोटा स्थानांसाठी पात्र होते, विजयवीरने एलिमिनेशन राऊंडमध्ये २८ शॉट्सह आपले कौशल्य दाखवले. तो ३२ शॉट्सह सुवर्ण जिंकणाऱ्या कझाकिस्तानच्या निकिता चिर्युकिनला मागे राहिला आणि रौप्य पदकावर नाव कोरले. रॅपिड-फायर पिस्तूल ही पारंपारिकपणे भारतासाठी एक मजबूत स्पर्धा आहे, विजय कुमारने २०१२ लंडन ऑलिम्पिक गेम्समध्ये रौप्य पदक जिंकले होते. विजयवीर आणि अनिश या दोघांनीही त्यात प्रवेश केला, तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रॅपिड फायर नेमबाजी प्रकारात देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन भारतीय नेमबाजांची ही पहिलीच वेळ असेल. भारतीय नेमबाजांनी आता जकार्ता येथे चार पॅरिस ऑलिम्पिक कोटा स्थान मिळवले आहेत, ज्यामध्ये ईशा सिंग (महिला १० मीटर एअर पिस्तूल), वरुण तोमर (पुरुष १० मीटर एअर पिस्तूल), रिदम संगवान (महिला २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल) आणि विजयवीर सिद्धू पात्रता फेरीच्या यादीत सामील झाले आहेत. अंतिम फेरीत, जेथे सहा अंतिम फेरीतील चार कोटा स्थानांसाठी पात्र होते, विजयवीरने एलिमिनेशन राऊंडमध्ये २८ शॉट्सह आपले कौशल्य दाखवले. तो ३२ शॉट्सह सुवर्ण जिंकणाऱ्या कझाकिस्तानच्या निकिता चिर्युकिन मागे राहिला आणि रौप्य पदकावर नाव कोरले. रॅपिड-फायर पिस्तूल ही पारंपारिकपणे भारतासाठी एक मजबूत स्पर्धा आहे, विजय कुमारने २०१२ लंडन ऑलिम्पिक गेम्समध्ये रौप्य पदक जिंकले होते.५७७ गुणांसह, विजयवीर सिद्धूने पात्रता फेरीत पाचवे स्थान मिळवले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. कझाकची नेमबाज निकिता चिर्युकिन, रिपब्लिक ऑफ कोरियाचा सॉंग जोंग-हो, सुकजिन हॉंग आणि जेक्युन ली आणि जपानची दाई योशिओका हे इतर नेमबाज होते ज्यांनी पदक फेरीत प्रवेश केला. विजयवीर सिद्धूने नेमबाजीत भारताला १७ वा ऑलिम्पिक कोटा मिळवून दिला. याआधी भारताचे इतके खेळाडू नेमबाजीत पात्र झाले नव्हते. यापूर्वी २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये १५ नेमबाजांनी भाग घेतला होता. विजयवीरने शनिवारी आशियाई ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूलमध्ये रौप्य पदक जिंकले. या वर्षी जुलै महिन्यात पॅरिस, फ्रान्स येथे स्पर्धा होणार आहे. विजय कुमारने २०१२ लंडन ऑलिम्पिक गेम्समध्ये रौप्य पदक जिंकले होते. विजयवीर आणि अनिश या दोघांनीही त्यात प्रवेश केला, तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रॅपिड फायर नेमबाजी प्रकारात देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन भारतीय नेमबाजांची ही पहिलीच वेळ असेल.

### भानवालानेही कोटा मिळवला

» रॅपिड-फायर पिस्तूल ही पारंपारिकपणे भारतासाठी एक मजबूत स्पर्धा आहे, विजय कुमारने २०१२ लंडन ऑलिम्पिक गेम्समध्ये रौप्य पदक जिंकले होते. विजयवीर आणि अनिश या दोघांनीही त्यात प्रवेश केला, तर पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रॅपिड फायर नेमबाजी प्रकारात देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन भारतीय नेमबाजांची ही पहिलीच वेळ असेल. भारतीय नेमबाजांनी आता जकार्ता येथे चार पॅरिस ऑलिम्पिक कोटा स्थान मिळवले आहेत, ज्यामध्ये ईशा सिंग (महिला १० मीटर एअर पिस्तूल), वरुण तोमर (पुरुष १० मीटर एअर पिस्तूल), रिदम संगवान (महिला २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तूल) आणि विजयवीर सिद्धू पात्रता फेरीच्या यादीत सामील झाले आहेत. अंतिम फेरीत, जेथे सहा अंतिम फेरीतील चार कोटा स्थानांसाठी पात्र होते, विजयवीरने एलिमिनेशन राऊंडमध्ये २८ शॉट्सह आपले कौशल्य दाखवले. तो ३२ शॉट्सह सुवर्ण जिंकणाऱ्या कझाकिस्तानच्या निकिता चिर्युकिना मागे राहिला आणि रौप्य पदकावर नाव कोरले. रॅपिड-फायर पिस्तूल ही पारंपारिकपणे भारतासाठी एक मजबूत स्पर्धा आहे, विजय कुमारने २०१२ लंडन ऑलिम्पिक गेम्समध्ये रौप्य पदक जिंकले होते.५७७ गुणांसह, विजयवीर सिद्धूने पात्रता फेरीत पाचवे स्थान मिळवले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला.

# ‘चिकू, आता तुला दोन षटकार मारावेच लागतील’!j

## टी-20 विश्वचषकात रौफच्या षटकात विराट काय विचार करत होता?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२२ मधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याने उत्साहाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या. या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना १५९ धावा केल्या होत्या, प्रत्युत्तरात भारतीय संघाने ३१धावांत ४ विकेट गमावल्या होत्या. येथून विराट कोहलीने ५३ चेंडूत ८२ धावा करत टीम इंडियाला विजय मिळवून दिला. सामन्याच्या शेवटच्या चेंडूवर भारताने हा विजय नोंदवला.**

या सामन्यात, विराट कोहलीने १९व्या षटकात हरिस रौफला मारलेल्या सलग दोन षटकारामुळे सामना भारताच्या बाजूने झुकला. या सामन्यात आणि हारिस रौफच्या त्या षटकात विराट कोहलीच्या मनात काय चालले होते, याबाबत किंग कोहलीने आता एका मुलाखतीत खुलासा केला आहे. स्टार स्पोर्ट्सच्या एका कार्यक्रमात जतीन सप्रूशी बोलताना विराट म्हणाला, “एवढ्या लवकर चार विकेट पडतील, असे वाटले नव्हते. अक्षर धावबाद झाल्यावर मी त्याची माफी मागितली. कारण तो माझ्यामुळे बाद झाला. काय होत आहे ते मला समजत नव्हते,



४५ धावांवर ४ आऊट झाले आहेत, मी २१ चेंडूत फक्त १२ धावा करून खेळत आहे. जेव्हा हार्दिक क्रीझवर आला, तेव्हा मी त्याला फक्त भागीदारी करायला सांगितले, सामना शेवटपर्यंत घेऊन जायचे ठरवले आणि हळूहळू वेग येत गेला.” अंतिम फेरीत भारताला विजयासाठी दोन षटकांत ३१ धावांची गरज होती. विराट आणि हार्दिक क्रीझवर होते, पण समोर हरिस रौफ होता. जतीन सप्रूने विचारले की, त्या क्षणी तुमच्या मनात काय चालले होते, यावर विराट म्हणाला, “तुम्हाला या षटकात २० धावा याव्यात, पण वास्तव हे आहे की त्या सामन्यात त्याने सर्वोत्तम गोलंदाजी केली होती. तो १४५ च्या वेगाने गोलंदाजी करतो, चांगले बाउन्सर टाकतो, स्लोअर बॉल देखील आश्चर्यकारकपणे टाकतो, यॉर्कर देखील चांगला आहे. त्यामुळे एखाद्याच्या मनात एक लक्ष्य असते पण नंतर हे देखील माहित असते की, आपल्याला जे करायचे आहे, ते समोरचा आपल्याला देणार नाही कारण त्याच्याकडे कौशल्य आहे. या षटकातील पहिल्या चार चेंडूत केवळ तीन धावा झाल्या होत्या आणि समीकरण पूर्णपणे बदलले होते. त्यावेळी, ईएसपीएन क्रिकइन्फोच्या अल्गोरिदमनुसार, टीम इंडियाच्या विजयाची अपेक्षा केवळ ३.१% होती.

### त्यावेळी मी स्वत:शी बोलत होतो

» पण यानंतर विराटने हारिसला सलग दोन षटकार मारले. यावर विराट म्हणाला, ‘त्यावेळी मी स्वतःशी बोलत होतो की, चिकू,आता तुला दोन षटकार मारावेच लागतील.’ रौफच्या षटकातील शेवटच्या चेंडूवर विराटने मारलेल्या नेत्रदीपक शॉटबद्दल तो म्हणतो, ‘मला माहित होते की एक सिंगल तर नक्कीच येईल.